# प्रसिध्दीपत्रक

विषय :- जानेवारी २०१६ ते जून २०१६ या सत्रासाठी जीसीसी-टिबीसी ३० श.प्र.मि. आवेदनपत्र भरणेबाबत.

संदर्भ :- १) अधिसूचना - दि. १२/०६/२०१६.
२) प्रसिध्दीपत्रक (मुदतवाढ) - दि. १७ जून २०१६.
३) प्रसिध्दीपत्रक (मुदतवाढ) - दि. २३ जून २०१६.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-०१ यांचे मार्फत जानेवारी २०१६ ते जून २०१६ या सत्रासाठी GCC-TBC ३० W.P.M. परीक्षा ऑगस्ट २०१६ मध्ये घेण्यात येणार आहे. अधिसूचनेतील कालावधीत व वाढीव मुदतीत आवेदनपत्र भरु न शकलेल्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे विलंब शुल्क आकारुन भरण्यास दि. २३ जुलै २०१६ पर्यंत परवानगी देण्यात येत आहे.

तथापि,

१) ही आवेदनपत्रे परीक्षा परिषदेत समक्ष भरुन घेतली जातील. (यासाठी ऑनलाईन लिंक (Link) दिली जाणार नाही.)

२) या सत्रासाठी ज्या विद्यार्थ्यांची नोंदणी संस्थांनी ऑनलाईन केली आहे, त्यांचीच आवेदनपत्रे भरता येतील.

३) संस्थाचालक/ प्राचार्य/ प्रतिनिधी (अधिकार पत्रासह) यांनी परिषदेत समक्ष हजर राहणे आवश्यक आहे.

४) ज्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरावयाची आहेत, त्यांचे अनुषंगिक अभिलेख (जनरल रजिस्टर, हजेरी पत्रक इ.) सोबत आणावे.

५) विलंब शुल्क दि. ०२/०७/२०१६ पासून प्रतिदिन प्रतिविषय ५०/- रु. प्रतिविद्यार्थी आकारले जाईल.शुल्क परिषदेत रोखीने भरावे लागेल (ऑनलाईन चलनाने भरता येणार नाही.)

(राजेश औ. क्षीरसागर)
सहा.आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-०१.

पुणे, दि. १९ जुलै २०१६

G:\PRESS NOTE.docx